**<u>युएलपी. क्र. ४४/२०२३</u>** **<u>पान क्र.</u>** **११** **<u>नि.क्र. सी—११</u>**

**<u>शपथेवर सरतपास श्री.आंबडकर अधिवक्ता गैरअर्जदारातर्फे</u> :—**

१३. शपथपत्र <u>नि.क्र. **सी—११**</u> मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. नि.सि.७ नुसार दस्त यादीतील अनु.क्रं.७ वरील पत्राची छायांकित प्रत मला दाखविली. सदर प्रत ही शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय प्राचार्य यांनी केलेल्या कार्यालयीन आदेशाची प्रत आहे. सदर छायांकित प्रत ही अर्जदाराचे अधिवक्ता यांना मान्य नसलयाने त्यास नि.क्रं. देता येणार नाही. नि.सि.७ नुसार दस्त यादीतील अनु.क्रं.४ वरील दि.१०/०४/२०१८ रोजीचे पत्राची छायांकित प्रत मला दाखविली सदर पत्र हे महाराष्ट्र शासनाव्दारे संचालक तंत्रशिक्षण संचालनालय महा.राज्य यांनी पाठविलेले आहे.

**सरतपास पूर्ण झाला.**

**उलटतपास अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. खंडारे यांचे तोंडी विनंती वरून पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—

(अ. दा. तिडके)

न्यायाधीश

दि. २६.११.२०२५. कामगार न्यायालय, चंद्रपुर